MHNB030000762021

दाखल तारीख : ०५-०१-२०२१
नोंद तारीख : ०५-०१-२०२१
निकाल तारीख : २९–०६–२०२६
कालावधी : ०५ व.०५ म.२४ दि.

**२ रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार यांचे न्यायालयात**

**पिठासिन अधिकारी – श्रीमती. अस्मिता एस. वानखडे**

**नियमीत फौजदारी खटला क्र. ०८/२०२१** **निशाणी क्र.**-१०९/ब

महाराष्ट्र शासन, : **अभियोग पक्ष...**
मार्फत: उपनगर पोलीस स्टेशन,
ता. जि. नंदुरबार.

**विरुध्द**

१. पदमसिंग प्रतापसिंग राजपुत, :
वय : ५३ वर्षे, धंदा :मजुरी

२. ओंकारसिंग उर्फ पांडुरंग चिंधुसिंग राजपुत, :
वय : ४० वर्षे, धंदा :मजुरी,

३. सुरेश रतनसिंग राजपुत, :
वय : ६० वर्षे, धंदा :मजुरी,

४. नारायणसिंग खुमानसिंग राजपुत, :
वय : ४९ वर्षे, धंदा : मजुरी,

५. चंद्रसिंग भगतसिंग राजपुत, :
वय : ५९ वर्षे, धंदा :मजुरी,

| | | |
|---|---|---|
| ६. गोरख लखसिंग राजपुत,<br>वय : ४५ वर्षे, धंदा :मजुरी, | : | |
| ७. जिग्नेश उर्फ धर्मराज आनंदसिंग राजपुत,<br>वय : ३५ वर्षे, धंदा :मजुरी, | : | |
| ८. भटु लखेसिंग राजपुत,<br>वय : २७ वर्षे, धंदा :मजुरी,<br>सर्व रा. राकसवाडा ता. जि. नंदुरबार | : | **आरोपी...** |

---

| | | |
|---|---|---|
| श्री. डी.एन.कदमबांडे | : | सहा. सरकारी अभियोक्ता |
| श्री. पी.डी.पाटील | : | आरोपींतर्फे विधीज्ञ |

---

## न्यायनिर्णय

(घोषित तारीख :२९/०६/२०२६)

**०१.** आरोपींविरुध्द प्रस्तुत प्रकरण भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे संक्षेपाकरिता 'भा.दं.वि.' असा उल्लेख करण्यात येईल) चे कलम १४३, १४७,१४८, ३२४,३३६,४२७,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे दोषारोप सिध्दतेकरिता दाखल आहे.

**०२.** अभियोग पक्षाचा थोडक्यात असे कथन आहे की, दि. ३०/११/२०२० रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी दिलीप रोहिदास पाटील, याची पत्नी, त्याचे शालक डॉ. राजाराम पटेल, त्याचा भाऊ भगवान पटेल व परिवार असे दरवाजा बंद करुन बसले असतांना आरोपी पदमसिंग राजपुत यांची मुलगी राधीका सोबत फिर्यादीचा

मुलगा आकाश याने प्रेम विवाह केला याचा राग आल्याने पदमसिंग राजपुत, पांडुरंग चिंधु, सुरेश रतन, नारायण गुमाणसिंग, चंद्रसिंग भगतसिंग, गोरख लखेसिंग, जिग्नेश व भटु लोटन सिंग हे त्यांचे घरासोमर आले व जोर जोराने आरोडया मारु लागले. त्यांनी फिर्यादीच्या घरावर दगडफेक करुन त्यांना घराबाहेर निघा असे बोलु लागले तसेच दरवाजा उघडा असे बोलुन शिवीगाळ करु लागले. त्यांनी वरील सर्व लोकांना त्याचे परिवारासह खिडकीतुन बघितले आहे. फिर्यादी खिडकीतुन बघत असतांना पदमसिंग राजपुत याने लोंखडी सळईने फिर्यादीचे डाव्या डोळयाचे खाली मारुन दुखापत केली. इतर लोकानी फिर्यादीच्या घराच्या दरवाज्याला लाता मारल्या त्यामुळे दरवाज्याचे नुकसान झाले. त्यातील काही लोकांना त्यांचे खिडकीचे काचावर दगड मारुन काच फोडले आहे. आरोपी पदमसिंग राजपुत व त्याचे सोबतचे लोंकांनी त्यांना घराच्या बाहेर निघा तुम्हाला मारुण टाकु अशी धमकी दिली. वाद सुरु असतांना पोलीस पेट्रोलिंगची गाडी आली तेथील सर्व जण पळुन गेले. त्यानंतर फिर्यादनी दवाखान्यात औषधपचार करुन उपनगर, पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली.

**०३.** फिर्यादीच्या प्रस्तुत फिर्यादवरुन आरोपींविरुध्द गु.र.क्र.I–६४६/२०२० अन्वये भा.दं.वि.कलम १४३, १४७,१४८, ३२४,३३६,४२७,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. घटनेचा तपास पो. उ. निरिक्षिक प्रशांत राठोड, उपनगर, पोलीस स्टेशन, नंदुरबार यांच्याकडे सूपुर्द करण्यात आला. तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, जखमीचे वैद्यकीय

प्रमाणपत्र हस्तगत केले, आरोपीस अटक केली आणि साक्षिदारांचे जबाब नोंदवून तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले.

**०४.** आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम १४३, १४७,१४८, ३२४, ३३६, ४२७,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे दोषारोप (नि.क्र.३४) निश्चित केला. दोषारोपाचा मजकूर आरोपींला वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यानी गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षा चालविण्याची विनंती केली.

**०५.** आरोपींवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र. १ भगवान रोहिदास पटेल निशाणी ४५, साक्षीदार क्र. २ रेखाबेन दिलीपभाई पटेल निशाणी ६०, साक्षीदार क्र. ०३ देविदास फकिरा पटेल निशाणी ६१, साक्षीदार क्र. ०४ फिर्यादी दिलीप रोहिदास पटेल निशाणी ६४, साक्षीदार क्र. ०५ डॉ. राजाराम मुकूंद पाटील निशाणी ६९, साक्षीदार क्र. ०६ प्रफुल भगवानभाई पटेल निशाणी ७०, साक्षीदार क्र. ०७ डॉ. अर्चना व्ही. वळवी निशाणी ७७, साक्षीदार क्र. ०८ तपासी अधिकारी प्रशांत जयसिंग राठोड निशाणी ८३ वर तपासण्यात आले. अभियोग पक्षाने तोंडी पुरावा व्यतिरिक्त कागदोपत्री पुरावा म्हणुन फिर्याद निशाणी ६५, घटनास्थळ व जप्ती पंचनामा निशाणी ६२, वैद्यकिय दस्त निशाणी ७८, मुद्देमाल पावती निशाणी ८४ इत्यादी कागदपत्राचा आधार घेतला आहे.

**०६.** आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब निशाणी क्र. ९१ ते ९८ प्रमाणे नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींचा बचाव नकारात्मक

स्वरुपाचा आहे.

**०७.** उभय पक्षांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाची सखोल शहानिशा केली. न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा खालीलप्रमाणे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. दि.३०/११/२०२० रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादीच्या घरासमोर राकसवाडा ता. जि. नंदुरबार येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्याचे सदस्य झाले आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४३ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी.** |
| २. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिष्ट साध्य करण्याकरिता दंगा केला आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४७ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी.** |
| ३. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिष्ट साध्य करण्याकरिता शस्त्रानिशी सज्ज होवुन दंगा केला आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४८ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | |
| ४. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिदष्ट साध्य करण्याकरिता सार्वजनिक ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना सळईने मारहाण | **नकारार्थी.** |

करुन इच्छापुर्वक साध्या स्वरुपाची दुखापत पोहचविली आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? ?

| | | |
|---|---|---|
| ५. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिदष्ट साध्य करण्याकरिता सार्वजनिक ठिकाणी मानवी जीवित किंवा इतरांची वैयक्तिक सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारे बेदरकारपणे व निष्काळजीपणाने कृत्य करुन फिर्यादी व साक्षीदारास दुखापत पोहचवली आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ३३६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो का? | **नकारार्थी..** |
| ६. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाचे समान उदिदष्ट साध्य करण्याकरिता फिर्यादीच्या घरावर दगडफेक करुन दरवाजे व खिडक्यांचे तोडफोड करुन नुकसान करुन फिर्यादीस आगळीक पोहचवली आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ४२७ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो का? | **नकारार्थी.** |
| ७. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन त्यांच्या बेकायदेशीर जमावाचे सामाईक उदिष्ट साध्य करण्याकरिता फिर्यादी यांना शिवीगाळ केली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहितचे कलम ५०४ सह कलम १४९ प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी.** |
| ८. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीसोबत संगणमत करुन त्यांच्या बेकायदेशीर जमावाचे सामाईक उदिष्ट साध्य करण्याकरिता फिर्यादीला व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचे आणि याद्वारे भारतीय दंड संहितचे कलम ५०६ सह कलम १४९ प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी.** |

९. आदेश काय ? **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.**

## <u>कारणमीमांसा</u>

### <u>मुद्दे क्र. १ ते ९ करिता</u>

०८. उपरोक्त मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पूनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत.

०९. सरकारी विधीज्ञ श्री.कदमबांडे यांनी असा युक्तीवाद केला आहे की, आरोपींनी त्यांच्या मुली सोबत फिर्यादीच्या मुलाने पळुन जाऊन लग्न केल्याचा आरोपीस राग आल्याने आरोपींनी फिर्यादीच्या घरावर दगडफेक करुन दंगा करुन फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केली आहे. फिर्यादीची साक्ष ही फिर्याद निशाणी ६५ शी सुसंगत आहे. तसेच साक्षीदार क्र.२ ते ७ यांची साक्ष फिर्यादीच्या पुराव्याशी सुसंगत आहे. प्रस्तुत प्रकरणांतील फिर्यादी व साक्षीदार क्र.२ ते ७ हे घटनास्थळावरील घरात उपस्थित होते. त्यामुळे त्यांनी घटना प्रत्यकक्षात पाहिली आहे. त्यामुळे फिर्यादी व साक्षीदारांचा पुराव्यात त्यांनी घटना पाहीली आहे असे लिहलेले नाही ही बाब प्रस्तुत प्रकरणाचा मुळाशी जात नाही. फिर्यादीने त्याचे पुराव्यात डोळयावर सळई मारली असे कथन केले आहे. फिर्याद मध्ये डाव्या डोळ्याचा खाली लोंखडी सळईने मारुन दुखापत केली आहे असा उललेख आहे. तसेच साक्षीदार क्र.७ डॉ.अर्चना वळवी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये डोळयाच्या खालच्या पापणीला जखम झाल्याचे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादीचा पुरावा हा

फिर्याद व वैद्यकिय अधिकारी यांच्या पुराव्याशी सुध्दा सुसंगत आहे. त्यांचे पुराव्यामध्ये किरकोळ अश्या विसंगती आढळुन येतात. डोळयावर मारहाण झाल्यामुळे सदर जखम ही डोळयाचा खालच्या पापणीला होवु शकते. घटनास्थळ पंचनामा निशाणी ६२ मध्ये मुद्देमाल सळई व दगड घटनास्थळावर जप्त झाल्याचे व घटनास्थळ फिर्यादीचे सिंमेटचे घर असुन त्यातील १५*२६ चा हॉल ज्याला एक दरवाजा व दोन खिडकी आहे तो दरवाजा हा खालच्या बाजुने तुटलेला व खिडकीच्या काचा फुटलेल्या आहेत व त्या ठिकाणाहुन एक अबोडधोबड दगड व लोखडी सळई जप्त केल्याचे नमुद आहे. आरोपी यांनी कोणताही मोठा बचाव प्रस्तुत प्रकणामध्ये घतलेला नाही. केवळ प्रकणामध्ये गुतागुंता निर्माण व्हावी म्हणुन खोटया स्वरुपाचा बचाव घेतलेला आहे. आरोपींनी गुन्हा केलेला नाही असे आरोपी म्हणत आहेत नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षाने त्याची केस संशयाचा पलीकडे जाऊन सिध्द केलेली आहे.

**१०.** साक्षीदार क्र. ४ फिर्यादी दिलीप रोहिदा पटेल यांच्या पुराव्यात असे आले की, दिनांक ३०/११/२०२० रोजी रात्री ९.३० वाजता पदमसिंग राजपुत यांची मुलगी व त्यांचा मुलगा यांनी रजिस्टर लग्न केले. त्याचा पमदसिंग यांना राग आला. पदमसिंग राजपूत, पांडुरंग राजपूत, गोरख राजपूत, चंद्रसिंग राजपूत, भटूसिंग राजपूत, जिग्नेश, नारायण राजपूत अशांनी राकसवाडा येथील त्याच्या घरावर दगडफेक केली. फिर्यादी खिडीतुन पाहत होता त्यावेळी पदमसिंग राजपूत यांनी त्याच्या डाव्या डोळयावर सळई मारली. फिर्यादी खिडकीतुन कोण दगडफेक करत आहे ते पाहत होता. त्यावेळी

घरात त्याची पत्नी रेखा, त्याचा शालक राजाराम, त्याचा भाऊ भगवान असे होते. त्यानंतर त्याठीकाणी पोलीस आले. त्यांना पाहुन वरील सदर लोक पळुन गेले. सदर दगडफेकीत त्याच्या घराचे खिडक्या व दरवाजाचे काच तुटले. त्याच्या डोळयाचा खालील जखमेची प्लास्टीक सर्जरी धुळे येथे केली. सदर दगड व सळई वस्तु अ व ब न्यायालयात ओळखले.

**११.** प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादीचा मुलगा व आरोपी पदमसिंग याची मुलगी यांनी पळुन जाऊन लग्न केले होते हे फिर्यादी व आरोपी यांना मान्य असल्याचे आढळुन येते. फिर्यादीने त्याचा उलटतपासात तो घटनेच्या दिवशी सायंकाळी ०७.०० वाजता तो व पदमसिंग व त्याचे नातेवाईक हे उपनगर पोलिस स्टेशनला हजर होते व पदमसिंग याने त्याला म्हटले होते की, त्याला त्याचा मुलीला भेटु दया व आरोपी पदमसिंग व त्याचे नातेवाईक मुलीला घरी घेवुन जाणार होते या बाबी मान्य केले आहे. या वरुन घटनेच्या काही तास पुर्वी फिर्यादी व आरोपी हे पोलीस स्टेशनला हजर होते एवढेच त्यावरुन निष्पन्न होते. त्याठिकाणी आरोपी व फिर्यादी मध्ये काही शाब्दीक बोलचाल झाले असे त्यावरुन आढळत नाही. आरोपींनी घटनास्थळावर दगडफेक केल्याचे व पदमसिंग राजपुत याला सळईने मारल्याचे उलटतपासात नाकारुन आरोपींनी अभियोग पक्षाची केस नाकारल्याचे आढळते. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केल्याचे नाकारलेले आहे असे त्यावरुन आढळुन येते.

**१२.** फिर्यादीने त्याचा पुराव्यामध्ये पदमसिंग राजपुत याने त्याचा डाव्या

डोळयावर सळई मारली असे कथन केले आहे. फिर्याद मध्ये फिर्यादीने पदमसिंग याने सळईने त्याचा डाव्या डोळयाचा खाली मारल्याबाबत कथन केले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीने कश्या पध्दतीने फिर्यादीला सळईने मारहाण केली या बाबतचा पुरावा काय आहे याबाबत शाहनिशा करणे आवश्यक आहे. आरोपीचे वकीलांनी त्याच्या युक्तीवादामध्ये आरोपींनी सळई कुठून आणली याबाबत फिर्यादीने काहीही कथन केलेले नसल्याने व सळई ही फिर्यादीने पोलीसांना दिली व ती फिर्यादीच्या झाडांना लावलेली होती व त्याबाबत फिर्यादीने त्याचे उलटतपासात सुध्दा मान्य केले असे कथन केले आहे.

**१३.** फिर्यादीने त्याचा पुराव्यात सुरवातीला सदर आरोपीने दगडफेक केल्याचे म्हटले आहे. परंतु त्याने आरोपीने दगडफेक केल्याचे पाहीले असे कथन केले नाही. फिर्यादीचे कथन असे नाही की, त्याला काही गोंधळांचा किंवा दगडफेकीचा आवाज आला व त्यामुळे तो खिडकिमध्ये गेला व खिडकीमधुन त्यावेळी पाहत असतांना त्याला आरोपी हे दगडफेक करतांना दिसुन आले किंवा आढळुन आले. त्याने त्याचा पुराव्यात आरोपी दगडफेक करत होते त्यामुळे त्याला निट बघता आले नाहीत व तो खिडकी दरवाजे बंद करुन घरात बसला होता अश्या स्वरुपाचे सुध्दा काहीही कथन त्याचा पुराव्यामध्ये केलेले नाही. त्याने कोण दगडफेक करत आहे असे खिडकीतुन बघत होता असे कथन केले परंतु त्यानंतर त्याने रात्रीच्या वेळी नेमक्या कोणत्या आरोपींना दगडफेक करतांना प्रत्यक्षात पाहिले याबाबत त्याच्या पुराव्यामध्ये स्पष्ट कथन केल्याचे आढळत

नाही.

**१४.** फिर्यादीने त्याचा पुराव्यात आरोपीने त्याला मारहाण केली त्यावेळी त्यांचे व आरोपी मधील अंतर किती होते, आरोपी हा त्याचा हातात सळई घेवुन आला होता किंवा आरोपीने फिर्यादीच्या अगंणातील झाडाला लावलेली सळई काढली व त्याने तो मारहाण करत होता याबाबत काहीही स्पष्ट कथन केलेले नाहीत. तसेच सळई नेमकी किती लांबी रुंदीची होती याबाबत सुध्दा काहीही कथन केलेले नाही. फिर्यादीने त्याचा उलटतपासात त्याने पोलीसांना सळई दिली होती व ती त्याचा घरा समोरील झांडाना लावलेली होती हे मान्य केले. तसेच दगड सुध्दा त्याचे घरा समोरचे आहे हे सुध्दा मान्य केले आहे. त्यामुळे घटनास्थळावर आरोपीच्या हातात नेमकी कोणती सळई होती याबाबतचा कोणताही परिस्थीतीजन्य पुराव्याची साखळी आढळुन येत नाही. केवळ फिर्यादीच्या झाडांना सळई लावलेली होती हे आरोपीने जरी मान्य केले असले तरी त्यावरुन आरोपीने तीच सळई घेवुन फिर्यादीला मारहाण केल्याचे सिध्द होत नाही कारण झाडाला लावलेल्या सळईने आरोपीने मारहाण केल्याचे फिर्यादीचे कथन नाही. त्यामुळे सदर सळई घटनास्थळावर आरोपीच्या हातात असल्याचे व सदर सळइने आरोपींनी मारहाण केल्याबाबत विश्वासाहार्य वाटत नाही. आरोपीचे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, कोणत्याही सळईने आरोपींनी फिर्यदीस मारहाण केली नाही, तसेच फिर्यादीने स्वःताच त्याच्या दारात असलेली सळई पोलीसांना स्वःताहुन दिली. पोलीसांनी ती घटनास्थळाहुन सुध्दा जप्त केलेली नाही. फिर्यादीने त्याचा पुराव्यात आरोपीने मारहाणी

नंतर सदर सळई तिथेच टाकुन दिली होती किंवा आरोपी सदर सळई घेवुन गेले किंवा मारहाणी दरम्यान ती सळई फिर्यादीने स्वःताच्या ताब्यात घेतली अश्या स्वरुपाचे कोणतेही कथन केलेले नाही. मारहाणी बाबतची घटना ही समोरासमोरची नसुन आरोपी पदमसिंग हा घराच्या खिडकीच्या बाहेर असतांना व फिर्यादी हा घरात खिडकीत अभा असतांना घडल्याचे अभियोगपक्षाचे कथन आहे. अशावेळी सळइने कशा पध्दतीने वार करण्यात आला व ती सळई किती लांबीची होती व त्यादोघांधमील अंतर किती होते हया संपुर्ण बाबीचा स्पष्ट उलगडा होणे आवश्यक होते परंतु त्याबाबात फिर्यादीचे पुराव्यात स्पष्टता नाही.

**१५.** फिर्यादीने त्याचा पुराव्यामध्ये सदर सळइने मारहाण झाल्यामुळे त्याला दुखापत झाल्याचे स्पष्ट कथन केलेले नाही. फिर्यादी हा प्रस्तुत प्रकरणातील मुख्य साक्षीदार असुन सुध्दा त्याला मारहाणीमुळे डोळ्याला दुखापत झाली किंवा डोळ्याच्या इतर भागावर दुखापत झाली अश्या स्वरुपाचे कथन त्याने त्याचे पुराव्यात केलेले नाही. फिर्यादीने केवळ डोळ्याच्या खालील जखमेची प्लॅस्टीक सर्जरी धुळे येथे केली हे त्याच्या पुराव्यातील कथन त्याला मारहाणी मुळेच डोळयाच्या खाली दुखापत झाल्याचे दर्शवत नाही. कारण जखम नेमकी कश्यामुळे झाली होती हे त्या वाक्यावरुन स्पष्ट होत नाही. त्याचे पुराव्यात स्पष्ट दुखापतीबाबत कथन नसतांना त्यांना सदर मारहाणीमुळे दुखापत झाली असा अनुमान काढणे सुध्दा संयुक्तीक ठरत नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये धुळे येथील प्लॅस्टीक सर्जरी केलेबाबत कोणतेही मुळ कागदपत्र अभिलेखावर दाखल कलेले

नाही. साक्षीदार क्र.७ डॉ. अर्चना वळवी यांनी सुध्दा त्याच्या पुराव्यामध्ये फिर्यादीला पुढील उपचाराकरीता धुळे येथे पाठविले असे कथन त्यांच्या पुराव्यामध्ये केलेले नाही. फिर्यादीने नेमक्या कोणत्या व कधी झालेल्या जखमीची प्लॉस्टीक सर्जरी धुळे येथे कधी केली याबाबत काहीही सविस्तर कथन केलेले नाही. तसेच त्याचे घराचे खिडक्या व दरवाज्याचे काच नेमक्या कोणत्या आरोपीच्या दगडफेकीमुळे फुटले याबाबत त्याने कथन केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीची साक्ष अभियोग पक्षास आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द होण्याकरीता पुरेसी वाटत नाही. त्यामुळे अभिलेखावरील उर्वरित साक्षीदाराचे पुराव्यातील अवलोकन करणे आवश्यक आहे.

**१६.** साक्षीदार क्र. ०१ भगवानभाई रोहिदास पटेल यांचे पुराव्यात असे आले की, घटना ४ वर्षापुर्वी घडली त्यावेळी आरोपी पदमसिंग राजपुत व इतर लोक त्याचे घराचे समोर आले त्यावेळी त्याचा घराचा दरवाजा बंद होता. वरील सर्व लोकांनी त्याच्या घरावर दगडफेक केली. त्याचा भाऊ दिलीप पटेल खिडकीतुन बाहेर बघत होता. त्यावेळी पदमबापु यांने लोखंडी सळईने दिलीप यांचे डोळ्यावर मारहाण केली. त्यानंतर पोलीस आले. त्याचे घरातील इतर लोकांनी दिलीप यास धुळे येथे आणले.

**१७.** सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपासात फिर्यादीचा मुलगा आकाश हा त्याचा भावाचा मुलगा आहे, त्यांच्या लग्नास दोन्ही कुटूंबाचा विरोध होता, आकाश व दिपीकेचा लग्नामुळे पदमसिंग याने त्याच्या विरुध्द पोलीस स्टेशनला आले व लग्नानंतर आकाश व दिपीका यांना पोलीस स्टेशनला आणले होते हया बाबी मान्य केल्या आहेत.

सदर साक्षीदाराने इतर लोक म्हणजे कोण याबाबत सविस्तर कथन केलेले नाही. त्याने त्याच्या घराचा दरवाजा बंद होता असे कथन केले असतांना त्याने नेमके कुठून आरोपी पदमसिंग व इतरांनी दगडफेक केल्याचे पाहिले याबाबत स्पष्ट कथन केलेले नाही. तसेच त्याने सुध्दा त्याच्या पुराव्यात सदर मारहाणी मुळे त्याच्या भावाला दुखापत झाली असे कथन केलेले नाही. तसेच घटना ही रात्रीची वेळेची असल्यामुळे त्याला आरोप कसे दिसले याबबात सुध्दा त्याच्या पुराव्यात कथन नाही. सदर साक्षीदार फिर्यादीचा भाऊ असल्यामुळे त्याचे प्रस्तुत प्रकरणामध्ये हित नाकारता येत नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षास आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द होण्याकरीता विश्वासार्ह वाटत नाही.

१८. साक्षीदार क्र.०२ रेखाबेन दिलीपभाई पटेल यांच्या पुराव्यात असे आले की, दिलीपभाई रोहिदास पटेल तिचे पती आहेत. तिचे पती, तिचे जेठ व ति स्वःता अश्यांवर आरोपी पदमसिंग राजपुत, चंद्रसिंग राजपुत, पांडुरंग राजपुत, गोरख राजपुत, सुरेश राजपुत, जिग्नेश राजपुत, भट्टुसिंग राजपुत अश्यांनी दगडफेक केली होती. तसचे त्यांनी त्यांच्या घरावर सुध्दा दगडफेक केली, दरवाजाला लाता मारल्या व खिडकीचे काचा फोडल्या होत्या. पदमसिंग राजपुत याने लोखंडी सळई फेकुन मारली त्यामुळे तिचे पती दिलीपभाईचे डोळ्याला सळई लागल्यामुळे दुखापत झाली होती. वरील सदर लोक त्यांना धमकी देत होते की, तुम्ही बाहेर निघा तुम्हाला आम्ही मारुन टाकु. तसेच ते शिवीगाळ करत होते. त्यानंतर ते दरवाजा बंद करुन ते घरातच थांबले व पोलीसांना

घटनेबाबत सांगितले. पोलीस आल्यानंतर त्यांनी दरवाजा उघडला त्यानंतर ते दवाखान्यात गेले. तिने सदर सळई वस्तु अ व दगड वस्तु ब व क न्यायालयात ओळखले.

**१९.** सदर साक्षीदाराची साक्ष की, तिचे पती, जेठ व ती अश्यांवर आरोपीने दगडफेक केली, सदर आरोपीने दरवाज्याला लाथा मारल्या व खिडकीच्या काच्या फोडल्या तसेच, आरोपी पदमसिंग याने सळई फेकुन मारली व त्यामुळे पदमसिंग याला दुखापत झाली, आरोपी हे धमकी देत होते की, तुम्ही बाहेर निघा तुम्हाला मारुन टाकु व ते शिवीगाळ करत होते ह्या संपुर्ण बाबी सुध्दा फिर्यादीच्या पुराव्याशी सुसंगत नाही. सदर साक्षीदार ही घटनेच्यावेळी नेमकी कुठे होती व तिला घटना कुठून दिसली याबाबत तिचे पुराव्यामध्ये स्पष्टता नाही. सदर साक्षीदाराने तिचे उलटतपासात सळई वस्तु अ तिच्या पतीने पोलीसांना दिली होती व ती त्यांचीच आहे, पोलीसांनी त्यांना सरकारी दवाखान्यात जाण्याकरीता मेमो दिला नव्हता, तिच्या पतीला सरकारी दवाखान्यात नेले नव्हते ह्या बाबी मान्य करुन दिनांक ३०/११/२०२० रोजी ती तिच्या पतीला घेवुन खाजगी दवाखान्यात गेली होती, पोलीसांनी तिच्याकडे तिच्या पतीचे वैद्यकिय दस्ताऐवज मागितले होते व तिने सदर मुळ दस्त पोलीसांना दिले होते, तसेच घटना प्रत्यक्षात पाहिली असे शब्द तिचे जबाबामध्ये नाही असे कथन केले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये दिनांक ३०/११/२०२० रोजी फिर्यादीने वैद्यकीय उपचार घेतल्याबाबत कोणतेही वैद्यकीय दस्त अभिलेखावर नाही. सदर साक्षीदाराने घटना प्रत्यक्षात पाहिल्याबाबत

विश्वासाहार्य वाटत नाही. त्यामुळे अभिलेखावरील उर्वरित साक्षीदाराचे उवलोकन करणे आवश्यक आहे.

**२१.** साक्षीदार क्र. ३ देविदास फिकिरा पाटील यांचे पुराव्यात असे आली की, पोलीसांनी त्यांना फिर्यादीच्या घराच्या बाजुला पंचनामा करण्याकरीता दिनांक ०१/१२/२०२० दुपारी ४.०० वाजता बोलावले होते त्याठिकाणी फिर्यादीला जे मारले होते व दगडफेक केली होती ह्याचा पंचनामा नि. ६२ केला होता. घटनस्थळाचा पुर्वेला रिकामी जागा, पश्चिमेला राहत्या लोकांची घरे, उत्तरेला भगवाना रोहिदस व दिलीप रोहिदास ह्यांची घरे आहेत. दक्षिणेला आरोपींची घरे आहेत. घटनास्थळावर फिर्यादी व पोलीस हजर होते त्याठिकाणी खिडक्याची काच फुटलेली होती व सळ्या पडल्या होत्या. सदर सळई त्याने न्यायालया समक्ष ओळखली.

**२२.** सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पोलीसांनी घटनास्थळावर सळई जप्त केली असे कथन केले नाही. पंचनामा निशाणी ६२ उवलोकन केले असता सळई व दोन ओबोड थोबळ दगळ घटनास्थळावरुन मिळुन आले अश्या स्वरुपाचा उल्लेख आहे. फिर्यादी व त्याची पत्नी साक्षीदार क्र.२ यानी त्याच्या पुराव्यामध्ये सदर सळई ही त्यांच्या झाडाला लावलेली सळई असुन ती त्यांचीच आहे, फिर्यादीने ती पोलीसांना दिली होती असे स्पष्ट कबुली त्यांच्या उलटतपासात दिली आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात फिर्यादी त्याचा भाचा आहे, पोलीसांनी पंचनामा त्याचा समक्ष केला नाही, तो जाण्यापुर्वी पोलीसांनी पंचनामा लिहुन ठेवला होता, पंचनामा मध्ये काय लिहले

याबाबत त्याला माहीत नाही या संपुर्ण बाबी मान्य केल्या आहेत. त्यावरुन सदर साक्षीदाच्या समक्ष जप्ती पंचनामा झाल्याबात विश्वासहार्यता वाटत नाही. त्यामुळे सदर साक्षीदारा पुराव्यामध्ये जप्ती पंचमनामा निर्विवाद पणे सिध्द होत नाही.

२३. साक्षीदार क्र ०५ डॉ. राजाराम मुकूंद पाटील यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तो दिलीपभाई यांचेकडे पाहुण म्हणुन गेला होता त्यादिवशी त्याचा भाचा आकाश याचा त्यांना फोन आला होता की, तुम्ही माझेकडे या. त्यामुळे तो राकसवाडा येथे आला होता. दिनांक ३०/११/२०२० रोजी आकाश व दिपीका पोलीस स्टेशनला हजर झाले होते. त्यादिवशी रात्री ९.३० च्या सुमारास पदमसिंग व गावातील काही व्यक्तीनी त्यांच्या मेहुण्यांचा घरावर हमला केला होता. गावातील काही लोक गोळा होवुन ते त्याचे मेहुणे व बहीणीला शिवीगाळ करत होते ते लोक त्या दोघांना म्हणत होते की, तुम्ही मुलीला का घेवून गेले. त्यावेळी त्याच्या पाहुण्यांनी घराची खिडकी उघडली व कोण आहे ते बघण्यास गेले त्यावेळी पदमसिंग याने लोखंडी सळईने दिलीपभाईवर हमला केला. त्याच्या डोळयाच्या खालच्या भागाला लागले. लोंकांनी त्याच्या पाहुण्यांचा घरावार दगड मारले होते ते लोक कोण होते ते त्याला माहीत नाही. पदमसिंग यांनी म्हटले की, तुम्ही घराबाहेर निघा तुम्हाला आज मारुन टाकु.

२४. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात त्याने घटना नेमकी कुठून पाहील याबबात स्पष्ट कथन केलेले नाही. सादर साक्षीदाराची साक्ष पदमसिंग व गावातील काही व्यक्तीनी त्याचा मेहुणा व बहीणीला शिवीगाळ केली व त्याना म्हणत होते की, तुम्ही

मुलीला का घेवुन गेलेत व त्यावेळी त्याचा मेहुणा फिर्यादीने खिडकी उघडली हया बाबी फिर्यादीच्या पुराव्याशी सुसंगत नाही. कारण फिर्यादीने त्याबाबत त्याचा पुराव्यामध्ये कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने फिर्यादीवर सळईने कश्या पध्दतीने हमला केला हया बाबत सुध्दा स्पष्ट कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पदमसिंग याने म्हटले की, तुम्ही घराबाहेर निघा तुम्हाला आज मारुन टाकू व पोलीसांची पेट्रोंलिगवर असलेली गाडी त्याठिकाणी आली याबाबी फिर्यादीच्या पुराव्याशी सुसंगत नाही कारण फिर्यादीने त्याबाबत त्याचा पुराव्यामध्ये कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने त्याचा उलटतपासात दिनांक ३०/११/२०२० रोजी कोरोना माहामारीचा काळ होता, त्याचे हॉस्पीटल गुजरात येथे नेत्रंग येथे आहे. त्याठिकाणी ते ३० वर्षापासुन वैद्यकीय व्यवसाय करतात, त्यादिवशी त्याने गुजरात येथुन महाराष्ट्र येथे येण्याकरीता कोणताही पास घेतलेला नव्हता हे मान्य केले आहे. सदर घटना ही कोरोना माहामारीचा काळातील असतांना सुध्दा सदर साक्षीदार याचेकडे महाराष्ट्र मध्ये येणेकरीता त्यांच्याकडे कोणताही परवानगीचा दस्त होता असे आढळुन येत नाही व तसा कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच त्याचे पुराव्यातील वरील विसंगतीमुळे सुध्दा तो घटनास्थळावर प्रत्यक्षात हजर होता याबाबत विश्वसाहर्यता वाटत नाही.

**२५.** साक्षीदार क्र. ०६ प्रफुल भगवानभाई पटेल त्याचे पुराव्यात असे आहे की, दिलीपभाई हे त्याचे काका आहेत. दिनांक ३०/११/२०२० रोजी तो त्याचे काका,काकु,आईवडील व मामा असे घरी बसलेले होते. त्यावेळी त्यांच्या घरातील

दरवाजा बंद होता. अचनक कोणीतरी दरवाजावर दगड मारला व अचनाक बाहेरुन आवाज आला की, बाहेर निघा बाहेर निघा. परंतु ते बाहेर निघाले नाही. त्याचे काका दिलीपभाई हे खिडकी मधुन बाहेर बघण्यायस गेले तेव्हा पदमसिंग राजपुत याने त्याचा काकाचा डोळयावर सळई मारली व दरवाजावर देखिल दगड मारले. सदर सळई न्यायालयात ओळखली. बाहेरुन आवाज येत होता की, आज तुम्हाला मारुन टाकु त्यानंतर पोलीसांची गाडी तेथे आली व सर्व जण पळुन गेले.

२६. सदर साक्षीदार हा घटनेच्या वेळी घटनास्थळावर होता किंवा फिर्यादीच्या घरी होता याबाबात फिर्यादीने त्याच्या पुराव्यामध्ये काहीही सांगितले नाही. सदर साक्षीदाची साक्ष की अचानक बाहेरुन आवाज आला की, बाहेर निघा बाहेर निघा, तसेच बाहेरुन आवाज येत होता की, आज तुम्हाला मारुन टाकु ह्या संपुर्ण बाबी फिर्यादीच्या पुराव्याशी सुसंगत नाही कारण फिर्यादीने त्याच्या पुराव्यामध्ये त्याबाबत काहीही कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने त्याचा उलटतपासात घटनेच्या वेळी त्याचा रहिवासी अहवा जिल्हा डांग येथील होता, पोलीसांनी ते त्याच्या जबाबमध्ये नमुद केला नाही, त्याने त्याबाबत पोलीसांना सांगितले होते पंरतु पोलीसांनी सदर पत्ता त्याच्या जबाबात का नमुद केला नाही याचे कारण त्याला माहीत नाही व त्याने पोलीसांना जबाब देते वेळी राकसवाडा येथे राहत असल्याचे सांगतिले होते अस कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या काकाला मारहाणीमुळे दुखापत झाल्याचे कथन केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदार घटनेच्यावेळी घटनास्थळावर उपस्थित होता व त्याने घटना प्रत्यक्षात पाहील्या

बाबत विश्वासाहार्य वाटत नाही.

**२७.** साक्षीदार क्र. ७ डॉ. अर्चना विशाल वळवी यांचे पुराव्यात असे आले की, दिनांक ३०/११/२०२० रोजी त्या हॉस्पीटल मध्ये हजर असतांना दिलीप रोहीदास पटेल हा हॉस्पीटल मध्ये आला त्याला त्यांनी तपासले. दिलीप याने त्याला मारहाण झाल्याबाबत व त्यामुळे त्याला डाव्या डोळ्याचा खालच्या पापणीला दुखापत झालयाचे सांगितले. सदर दुखापत ही ताजी व साधी स्वरुपाची होती. त्यानंतर त्यांनी वैद्यकिय उपचार दिला व डोळयाचा खालच्या पापणीच्या जखमेबाबत उपचाराकरीता रुग्णास पुढे पाठविले. त्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र ७८ दिले. सदर जखम ही तिक्ष्ण वस्तुमुळे होवु शकते.

**२८.** सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतपासात फिर्यादी हा त्याच्याकडे औषध उपचाराकरीता किती वाजता आला होता याबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यानी त्याच्या उलटतपासातमध्ये दिनांक ३०/११/२०२० रोजी रात्री ९.३० वाजता दरम्यान जखमी हा आला होता व तो राकसवाडा येथील राहणार होता असे कथन केले आहे. त्यांनी त्याच्या पुराव्यामध्ये त्या नेत्र तज्ञ म्हणुन घटनेच्या वेळी नेमक्या कुठे कार्यरत होत्या हयाबाबत स्पष्ट कथन केलेले नाहीत. घटनेची वेळ ही सुध्दा रात्री ९.३० वाजेच्या दरम्यानची असल्याबाबत अभियोग पक्षाचे कथन आहे त्यामुळे जखमी फिर्यादी हा ९.३० वाजेच्या दरम्यान हा घटनास्थळ व हॉस्पीटल या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी कसा उपस्थित असु शकतो याबाबत अभिलेखावरील पुराव्यावरुन उलघडा होत नाही.

सदर साक्षीदाराने त्यांचे उलटतपासात वैद्यकिय दस्त नि.७८ मध्ये सदर जखमेची वय नमुद नाही व त्यांनी नमके कधी सदर वैद्यकिय दस्त नि.७८ दिल्याबाबत त्यांना सांगत येत नाही हे मान्य केले आहे. तसेच सदर जखम ही दरवाजा किंवा खिडकिचा कठीण भागामुळे होवु शकते व त्यांनी सदर वैद्यकिय कागदपत्रामध्ये तिक्ष्ण वस्तु मुळे सदर जखम झाल्याचे नमुद केलेले नाही हे मान्य केले आहे.

**२९.** सदर वैद्यकिय दस्त निशाणी ७८ चे उवलोकन केले असता त्यामध्ये जखमीला तपासल्याबाबत वेगळी कोणतीही तारीख नमुद असल्याचे आढळत नाही. सदर वैद्यकिय प्रमाणेपत्रावर दि.०१/१२/२०२० ही तारीख नमुद असल्याचे व त्यामध्ये जखमेचे वय किंवा जखम किती तासाच्या आतिल आहे याबाबत काहीही नमुद नाही. तसेच सदर जखम ही तीक्ष्ण वस्तुमुळे होऊ शकते असे सुध्दा त्यामध्ये नमुद नाही. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यामध्ये सदर जखम ही सळईने मारहाण केल्यामुळे होऊ शकते असे सुध्दा सांगितलेले आहे. फिर्यादीने त्याच्या पुराव्यामध्ये त्याला दुखापत झाल्यामुळे तो साक्षीदार क्र.७ डॉ.अर्चना वळवी यांचे दवाखान्यात गेला होता याबाबत काहीएक कथन केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन वैद्यकीय दस्त नि.७८ हा जरी सिध्द होत असला तरी त्यावरुन आरोपीने सळईने मारहाण केल्यामुळे फिर्यादीस दुखापत झाल्याचे सिध्द त्यावरुन सिध्द होत नाही.

**३०.** साक्षीदार क्र.८ तपासी अंमलदार प्रशांत जयसिंग राठोड यांचे पुराव्यात

असे आले आहे की, सदर गुन्ह्याचा तपास त्यांचेकडे दिला होता. तपासासाठी त्यांच्याकडे प्रथम खबर खबरी रीपोर्ट दिले. तयानंतर ते घटनास्थळी गेले. दोन पंच रोहीदास फकीरा पटेल व देविदास फकीरा पटेल यांना बोलावुन घटनेची हकीकत सांगितली. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा नि.६२ केला. घटनास्थळावरुन दोन आबडधोबड दगड व सळई जप्त केली. पोलिस स्टेशनला सदर मुद्देमाल जमा केला व त्याची पावती नि.८४ घेतली. त्यानंतर साक्षीदारांचा जबाब नोंदविला. त्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्र नि.७८ दिनदयाळ डोळ्यांचे दवाखान्यातुन हस्तगत केले. तपासामध्ये निष्पण झाले की आरोपींनी बेकायदेशीर जमाव करुन आरोपी क्र.१ यांने फिर्यादीचे डोळ्यावर लोखंडी सळई मारुन दुखापत केली.

**३१.** सदर साक्षीदाराने त्याने घटनास्थळावरुन किती लांबी-रुंदीची सळई व किती वजनाचे दगड घटनास्थळावरुन जप्त केले याबाबत त्यांचे पुराव्यामध्ये व घटनास्थळ पंचनामा नि.६२ मध्ये काहीएक कथन केलेले नाही. त्यांनी त्यांचे उलटतपासात घटनाघडल्यानंतर फिर्यादी पोलिस स्टेशनला आला होता व जखमी पोलिस स्टेशनला आल्यावर त्याला मेमो दिला जातो, त्यांच्या तपासात जखमीला मेमो दिल्याबाबत निष्पन्न झाले नाही व दिनदयाळ हॉस्पीटल हे खाजगी आहे याबाबी मान्य केल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादचे अवलोकन केले असता फिर्याद दि.०१/१२/२०२० रोजी पोलिस स्टेशनला दिल्याचे आढळते. सदर फिर्याद ही दि.०१/१२/२०२० रोजी नेमकी कधी पोलिस स्टेशनला दिली त्याबाबतचा निश्चीत

वेळ फिर्यादवर नमुद असल्याचे आढळत नाही. घटना ही दि.३०/११/२०२० रोजीची असतांना व पोलिस देखील घटनेनंतर घटनास्थळावर आले असे फिर्यादी व साक्षीदार यांचे कथन असतांना फिर्यादीने फिर्याद ही दि.०१/१२/२०२० रोजी उशीराने का दाखल केली याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण फिर्यादीचे पुराव्यात नाही. तसेच फिर्यादीने त्याचे पुराव्यामध्ये घटनेनंतर तो वैद्यकीय उपचारासाठी सदर वैद्यकीय अधिकारी वळवी यांचेकडे गेला होता असे कथन नाही. वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे पुराव्यामध्ये जखमी फिर्यादी हा रात्री ०९.३० वाजता घटनेच्या दिवशी त्यांचे दवाखान्यात आल्याचे व त्याला तपासल्याचे कथन केले परंतु, त्यादीवशीचे कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात पुरेसा परीस्थीतीजन्य साखळी दर्शविणारा विश्वासार्य पुरावा सुध्दा आढळत नाही. सदर साक्षीदार हे प्रस्तुत प्रकरणातील तपासी अंमलदार असल्यामुळे त्यांची साक्ष ही अभिलेखापुर्ती मर्यादीत स्वरुपाची असल्याचे आढळत असुन आरोपी हे गुन्हा घडण्यास कसे कारणीभुत आहेत हे सिध्द होण्याइतपत विस्तृत स्वरुपाची असल्याचे आढळत नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी पुरेसी ठरत नाही.

**३३.** फिर्यादी व साक्षीदाराने त्यांचे पुराव्यामध्ये आरोपींनी कोणत्या भाषेत व शब्दात काय शिवीगाळ केली याबाबत काहीएक कथन केलेले नाही. फिर्यादीने त्याचे पुराव्यामध्ये आरोपीने त्याला धमकी दिल्याबाबत काहीएक कथन केलेले नाही. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीनेच त्याला सदर मारहाणीमुळे दुखापत झाल्याचे कथन केलेले

नाही. तसेच फिर्यादीच्या कथनानुसार त्याचे झालेल्या प्लास्टीक सर्जरी बाबतचे कोणतेही वैद्यकीय कागदपत्र अभिलेखावर दाखल करण्या आलेले नाहीत. जे वैद्यकीय दस्त नि.७८ दाखल करण्यात आली त्यावरुन सदर दुखापत आरोपीच्या मारहाणीमुळे झाल्याचे त्यावरुन निर्वीवादपणे सिध्द झालेले नाही. फिर्यादी व साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये सळईने नेमके डोळ्यावर मारले होते किंवा डोळ्याच्या खाली याबाबत सुध्दा विसंगती आढळते. डोळयाची पापणी हा डोळयाच्या खालील भाग नसुन हा डोळयाचाच एक भाग आहे. त्याबाबत फिर्यादीची साक्षी ही फिर्याद मधील मजकुराशी सुसंगत असल्याचे आढळत नाही. प्रस्तुत घटना ही सार्वजनिक ठिकाणी घडलेली असतांना प्रकरणात स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब नोंदविण्यात आलेला नाही. साक्षीदार क्र.१, २, ३, ५ व ६ हे फिर्यादीचे नातेवाईक असुन त्यांची साक्ष ही मोगम स्वरुपाची असल्याचे आढळते. सदर साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक असल्यामुळे त्यांची प्रस्तुत प्रकरणात हीत नाकारता येत नाही. अभियोग पक्षास पुरेसी संधी देऊनही उर्वरीत साक्षीदारांना प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेले नाही. अभियोग पक्ष उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्याच्या आधारे आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन आरोपी त्याचे सदस्य झाले, बेकायदेशीर जमावाचे समान उदिष्ट साध्य करण्याकरिता दंगा केला, फिर्यादी व साक्षीदारांना लोखंडी सळईने मारहाण करुन इच्छापुर्वक साध्या स्वरुपाची दुखापत पोहाचविली, निष्काळजीपणे फिर्यादीचे घरावर दगडफेक करुन फिर्यादीचे घराचे खिडकी व दरवाजाचे नुकसान करुन फिर्यादीस आगळीक पोहचविली, शिवीगाळ केली व धमकी

दिली हे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३,१४७,१४८, ३२४, ३३६, ४२७,५०४,५०६ सह कलम १४९ चे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोग पक्ष सपशेल अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या कमकुवत पुराव्याआधारे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दे क्र. १ ते ८ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ९ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे :

:: **<u>आदेश</u>** ::

१) आरोपी क्र.१ पदमसिंग प्रतापसिंग राजपुत, आरोपी क्र.२ ओंकारसिंग उर्फ पांडुरंग चिंधुसिंग राजपुत, आरोपी क्र.३ सुरेश रतनसिंग राजपुत, आरोपी क्र.४ नारायणसिंग खुमाणसिंग राजपुत, आरोपी क्र.५ चंद्रसिंग भगतसिंग राजपुत, आरोपी क्र.६ गोरख लखेसिंग राजपुत, आरोपी क्र.७ जिग्नेश उर्फ धर्मराज आनंदसिंग राजपुत, आरोपी क्र.८ भट्टु लखेसिंग राजपुत यांना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३,१४७,१४८, ३२४, ३३६, ४२७,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये खालील गुन्हा केल्याच्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) जप्त मुद्देमाल जमा असलेल्या दोन ओबडधोबड आकाराचे दगड व एक लोखंडी सळई मुल्यहीन असल्याने अपील आलावधी समाप्तीच्या नंतर नाश करण्यात यावा.

३) आरोपींचा वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये रु.२५,०००/– चे बंधपत्र व जामीन मुचलका द्यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ASMITA SHRIDHARRAO WANKHADE
Date: 2026.06.29 19:50:35 +0530

दिनांक : २९.०६.२०२६ (श्रीमती. अस्मिता एस. वानखडे)

ठिकाण : नंदुरबार. २ रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार